देशोन्नती दि

# सोन्या-चांदीच्या व्यापाऱ्यास लुटणारा आरोपी २४ तासात जेरबंद

देशोन्नती वृत्तसंकलन...

**धर्माबाद** ■ पोलीस स्टेशन धर्माबाद हद्दीत १० एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास धर्माबाद तालुक्यातील करखेली येथील आर्या ज्वेलर्सचे व्यापारी अजित माने (३०) रा. कारेगाव फाटा तालुका धर्माबाद हे नेहमीप्रमाणे सायंकाळी आपले दुकान बंद करून मोटर सायकलने

कारेगाव फाट्याकडे जात असताना पिंपळगाव येथील कॅनॉलजवळ अनोळखी ४ चोरांनी त्यांच्या मोटरसायकलचा पाठलाग करून मोटरसायकलच्या पाठीमागून धडक देऊन त्यांच्याजवळ असलेले लाखो रुपयांचे सोन्या-चांदीचे व नगदी रुपयाची बॅग चाकूचा धाक दाखवून जबरीने चोरून नेली.

माने यांच्या फिर्यादीवरून धर्माबाद पोलीस ठाण्यात गुरन ७२/२०२३ कलम ३९४,३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ पथक तयार करून स्वतः पथकासह निमटेक उमरी हा भाग पिंजून काढला.

पोलीस निरीक्षक शिंदे यांना गुप्त बातमीदारां मार्फत मिळालेल्या माहितीनुसार सदर गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार आरोपी हा गोळेगाव येथील असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी पथकासह जाऊन आरोपीस ताब्यात घेतले.

आरोपी यास पोलिसी खाक्या दाखवताच गुन्हा कबूल असल्याचे सांगितले. त्यावरून आरोपीस ताब्यात घेऊन २४ तासाच्या आत गुन्हा उघडकीस आणून अनोळखी आरोपी निष्पन्न करून आरोपीस जेरबंद केले आहे.

उपरोक्त पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रसाद कत्ते, सहा.पो.उप.नि. मसलेकर, अलीम, नागमवाड यांच्यासह ईतर पोलीस सहभागी होते. उपरोक्त कामगिरीचे धर्माबाद तालुक्यात कौतुक होत आहे.

# असदवन शिवारातील गोळीबार प्रकरणातील तीन आरोपी ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही, गावठी पिस्तुल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत असदवन भागात एका प्रेमीयुगुलास पिस्तुलचा धाक दाखवून गोळीबार करून चांदीची चैन व नगदी २ हजार रुपये जबरीने चोरुन फरार झालेल्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून गावठी पिस्तुल जप्त केल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

असदवन शिवारात तंत्रनिकेतन विद्यालयाचे पाठीमागे ३ एप्रिल रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी एका प्रेमी युगलास पिस्तुलचा धाक दाखवुन गोळीबार करुन चांदीची चैन व नगदी २ हजार रुपये जबरीने चोरुन नेले होते. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता.

दरम्यान यातील आरोपी ग्रामीण पॉलीटेकनिक कॉलेज ते वाघाळा जाणारे मार्गालगतचे पाण्याचे टाकीखाली बसलेले असल्याची माहीती मिळाली. त्यानुसार पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या आदेशावरून स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी तशी माहिती वरिष्ठांना देवुन स्थागुशाच्या पथकाने सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन आरोपी राजेंद्र ठाकुर (३२) रा. आकाशनगर, असदवन, अतिष ठाकुर (२२) रा. आकाशनगर, असदवन विष्णुपुरी, श्रीपाद ऊर्फ पियुष कदम (१९) वर्षे रा. बहर्जीनगर, वसमत ह. मु. आकाशनगर, असदवन विष्णुपुरी यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी गुन्हा केल्याचे सांगितले आहे. आरोपी राजेंद्र ठाकुर याने गुन्हा करताना वापरलेली गावठी पिस्तुल किंमती २० हजार रुपयाची जप्त करण्यात आली आहे. नमुद आरोपीतांना नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात दिल्याचे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर उपस्थित होते. कारवाई केलेल्या या पथकात सपोनि पांडुरंग माने, पोउपनि सचिन सोनवणे, जसवंतसिंघ शाहु, सपोउपनि माधव केंद्रे, पोकॉ देवा चव्हाण, मोतीराम पवार, तानाजी येळगे आदींचा समावेश होता.

